RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

# सोलापूर जिल्हयाच्या ग्रामीण विकासात जिल्हा परिषदेचे योगदान

नामदेव मुकुंद लवटे
इतिहास विभाग,
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

प्रस्तावना :

सोलापूर जिल्हा परिषदेने ग्रामीण विकासासाठी राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक क्षेत्रात महह्यवपूर्ण कामगिरी केली आहे. या संस्थेने ग्रामीण लोकांच्या गरजा लक्षात घेट्टन ग्रामपंचायत कार्यालये, शाळा इमारती, वाचनालय, समाज मंदिर, अंगणवाडी इमारत, गावातंर्गत रस्ते व दळणवळण, गटारी बांधकाम, स्मशानभूमी बांधकाम वृक्षारोपण, ह्रीडांगणे, बागबगीचे, दिवाबह्याी, तीर्थक्षेत्र विकास, शॉपिंग सेंटर, व्यायामशाळा, दलित वस्ती सुधारणा आणि घरकुल बांधकाम अशी अनेक कामे हाती घेट्टन ग्राम विकासात महह्यवपूर्ण योगदान दिले जाते.

१. ग्रामपंचायत कार्यालये : सोलापूर जिल्हयात एकूण गावांची संख्या ११४८ आणि ग्रामपंचायतीची संख्या इतकी असून प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक कार्यालय यानुसार जिल्हयात १०३० ग्रामपंचायत कार्यालये आहेत.[१] स्थानिक स्वराज्य संस्थेचा आणि लोकशाही विकेंद्रीकरणाचा अनुह्रमे शेवटचा व पाळणा समजल्या जाणाह्या संस्थेला महह्यवाची भूमिका, कर्तव्ये आणि अधिकार पार पाडण्यासाठी सरकारने ग्रामपंचायत कायदा केला आहे. आर्थिक विकास व सामाजिक न्यायाकरिता गावाच्या विकासाच्या योजना व अंमलबजावणी करण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेने ग्रामपंचायतींना दिला आहे. गावाच्या कारभाराकरिता लोकशाही पध्दतीने ग्रामपंचायतीवर सरपंच व उपसरपंच हया पदाधिकाह्याची व सदस्यांची निवड केली जाते. यांना गावच्या कामात सहकार्य करण्यासाठी सरकारने ग्रामसेवक नेमला आहे. ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व सचिव यांच्यावरती गाव विकासासाठी गावातील प्रशाकीय, ग्रामसभा व ग्रामपंचायतीच्या सभेची कामे, अंदापत्रक, हिशोब आणि आर्थिक व्यवहाराची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

२. शाळा इमारती : सोलापूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांची परिस्थिती सन २०११-१२ नुसार शाळांची संख्या २८७२ इतकी असून त्याचबरोबर जिल्हा परिषदेच्या मालकीच्या इमारती ९३२१ आणि भाडयाने घेतलेल्या खोल्या ८१८ व भाडेमुक्त खोल्या चावडया, समाज मंदिर, देट्टळ इत्यादी ठिकाणी ५२९ खोल्या आहेत.[२] प्राचीन काळापासून शिक्षणाला भारतामध्ये विशेष महह्यव होते. शिक्षण म्हणजे तृतीय नेत्र मानले जाते. दोन डोळयांनी दिसणाह्या ज्ञानापेक्षा त्यापलीकडचे ज्ञान शिक्षणामुळे प्राप्त होते. शिक्षणामुळे पुनर्जन्म होतो. म्हणून शिक्षण घेतलेल्या व्यक्तीला ‘द्विज’ असे म्हणतात.[३] ग्रामीण भागातील लोकांची शैक्षणिक वाढती गरज लक्षात घेट्टन सोलापूर जिल्हा परिषदेने जिल्हयातील सर्व गावात व वाडी, वस्त्यावरती शाळांची बांधकामे करून प्राथमिक शैक्षणिक विकासात मोठा हातभार लावला आहे. विद्यार्थ्यांची मुलभूत शैक्षणिक गरज लक्षात घेट्टन शाळा इमारती बांधल्या आहेत.

३. वाचनालय : महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार गाव तेथे ग्रंथालय ही चळवळ १९७४ पासून स्विकारण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हयात ग्रंथालयाच्या संख्येची वाढ झाली आहे. ग्रामीण भागातील वाचनालयाचा फायदा बहुसंख्य नागरिकांना मिळत आहे. आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर, बी-बियाणे, शेतीची अवजारे आधुनिक माहिती असणाह्या पुस्तिका वाचनालयात ठेवण्यात येतात.

यशवंत ग्राम समृध्दी योजनेअंतर्गत सर्वसाधारण लोकवस्तीसाठी १५ टक्के व दलित वस्तीसाठी १० टक्के लोकवर्गणी भरून एका आर्थिक वर्षात वाचनालय, ग्रंथालय उभा करण्याची योजना आहे.[४]

४. समाज मंदिर : हरिजन वस्तीमध्ये मागासवर्गीयांना सार्वजनिक कार्यह्रमासाठी एकत्रित जमण्यासाठी व इतर सर्व कार्यह्रमासाठी स्वतंत्र सोय व्हावी हया उद्देशाने नवीन समाजमंदिर बांधण्याची योजना सुरू करण्यात आली होती. सन १९८७ सालापर्यंत जिल्हयात एकूण १८० समाज मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले होते.[५] आजमितीस प्रत्येक गावात एक समाज मंदिर उभारले आहे. आज या समाज मंदिरांचा उपयोग हरिजन वाडयातील लोक बुध्द जयंती, डॉ. बाबासाहेब

आंबेडकर जयंती, लग्नकार्य, धार्मिक विधी, बालवाडया, दुपारी सावलीला बसण्यासाठी व गप्पा मारण्यासाठी, सण-उत्सव साजरे करण्याच्या कामासाठी करत असल्याचे दिसत आहे.

५. अंगणवाडी इमारत : ० ते ६ वयोगटातील बालकांची शैक्षणिक व आरोग्य विषयक प्रगती साधण्यासाठी जिल्हा परिषदेने प्रत्येक गावात एक अंगणवाडी इमारत उभी करण्याची मोहीम राबवली आहे. बालकांमध्ये प्राथमिक शिक्षण व आरोग्याच्या चांगल्या सुविधा व सुसंस्कार घडवून आणण्यासाठी ही योजना राबवली जात आहे. ज्या प्रकल्पामध्ये एकात्मिक बाल विकास सेवा योजना राबवली जात नाही तसेच त्या ठिकाणी बालवाडया चालू करावयाच्या आहेत. बालवाडया ग्रामपंचायती मार्फत राबविल्या जातील. बालवाडीमध्ये ४० पेक्षा जास्त बालके असतील. त्या बालवाडया कोणत्या संस्थेमार्फत चालवावयाच्या याचा निर्णय जिल्हा परिषदेने घ्यावयाचा आहे. तसेच अंगणवाडीची दुरूस्ती व देखभाल आणि अंगणवाडीला सेवा-सुविधा पुरवण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेवर टाकण्यात आली आहे. [६]

६. गावांतर्गत रस्तें व गटारे : २५१५ अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण योजनेतून ग्रामीण भागातील गावांतर्गत रस्ते व गटारे बांधली जातात. लोक प्रतिनिधीने सुचविलेल्या मुलभूत सुविधांच्या कामासाठी विशेष निधी शासनाकडून उपलब्ध करून दिला जातो. तद्नंतर अन्य कामे गरजेनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार मुलभूत सुविधांची कामे पूर्ण केली जातात.[७] सार्वजनिक बांधकाम विभागाकडून गावातील रस्ता व गटार बांधणी, दुरूस्ती व देखभालीसाठी अनुदान उपलब्ध करून दिले जाते. या योजनेमुळे गावातील सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यास मदत झाली आहे. शासन कॉंक्रीट रस्ते व गटारे बांधण्यासाठी या चांगल्या कामासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करून देत आहे.

७. स्मशानभूमी : सामाजिक असमतोलपणा दूर करण्याच्या दृष्टीकोनातून लोकसंख्येच्या आधारे जिल्हा परिषदेला विविध विकास कामे करावी लागतात. सोलापूर जिल्हा परिषदेच्या ११ व्या वित्त आयोगातील तरतुदीनुसार सन २००२ ते २००५ या कालावधीत जिल्हयात एकूण ५२८ दहनभूमी व दफनभूमी शेडची बांधकामे पूर्ण केली आहेत.[८] सोलापूर जिल्हा परिषदेने ग्रामीण भागातील सामाजिक असमतोलपणा दूर करण्यासाठी व वेगवेगळया जाती धर्मातील लोकांच्या प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी स्मशानभूमी आणि दफनभूमी यांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

८. वृक्षारोपण: सन १९८२ साली मंगळवेढा तालुक्यातील कात्राळ या गावी १५ एकर क्षेत्रावर फलोत्पादन करण्यासाठी जिल्हाधिकारी सोलापूर यांनी रू. ४०८९६३ खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिली होती.[९] कात्राळ ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील हलक्या, निकृष्ट, माळरान, जमिनीवर रोजगार हमी योजनेखाली वनीकरण व फलोउत्पादन योजना राबवून या भागाला निसर्ग रम्य स्थान प्राप्त करून दिले आहे. जिल्हा परिषद ग्रामपंचायती मार्फत ही योजना राबवत आहे. या वनराई मोहिमेमुळे ग्रामीण भागाचा पर्यावरणीय असमतोलपणा दूर होऊन ग्रामीण विकासात महत्त्वपूर्ण योगदान लाभले आहे.

पंचायतराजच्या माध्यमातून ग्रामीण भागात अनेक मुलभूत सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्याने ग्रामीण विकासात भर पडत आहे. शासनाच्या विविध योजनातून ग्रामीण भागाचा सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास होण्यास मदत होत आहे.

संदर्भ :

१. जिल्हा परिषद सोलापूर, वार्षिक प्रशासन अहवाल सन २०११-१२, पृ. १४४.
२. कित्ता, पृ. १०५.
३. भिडे गजानन, 'मध्ययुगीन भारताचा इतिहास', प्रथम आवृत्ती, जुलै, २०००, पृ. ७६.
४. जिल्हा परिषद सोलापूर, पंचायत विभागाकडील विविध योजनेबाबतची माहिती, पृ. ४.
५. जिल्हा परिषद सोलापूर, रौप्य महोत्सव 'स्मरणिका', १९८७, पृ.३.
६. शासन निर्णय क्र.:बाविआ-२००५/प्रक्र.३९०/वित्त-४, दि.३ डिसेंबर, २००५, पृ.२.
७. शासन निर्णय क्र: विकास/२००९/प्रक्र.८/पंरा८, दि.२४ फेब्रुवारी,२००९, पृ.४.
८. जिल्हा परिषद सोलापूर, यशोगाथा, पृ. ३.
9- उपरोक्त, स्मरणिका, पृ. १,११.